नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - १०८ | Issue - 108 | वार गुरुवार दि. ४ सप्टेंबर २०२५ | Blow- Thursday Date 4 September 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## देशभरात जीएसटीचे दोन स्लॅब रद्द

### जीएसटी परिषदेच्या बैठकीत निर्णय; निर्मला सीतारामन यांनी दिली माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : जीएसटी परिषदेच्या ५६ व्या बैठकीत सर्वसामान्यांना दिलासा देणारा अतिशय मोलाचा निर्णय घेण्यात आला आहे. या बैठकीत जीएसटीचे दोन स्लॅब रद्द करण्यात आले आहेत. जीएसटीचे १२ आणि २८ टक्के स्लॅब आता पूर्णपणे रद्द करण्यात आले आहेत. त्यामुळे आता केवळ ५ आणि १८ टक्के स्लॅब जीएसटी राहणार आहे. तसेच लक्झरी वस्तूंवर विशेष ४० टक्के जीएसटी स्लॅब लावण्यात येणार आहे. पण सर्वसामान्य, गरीब नागरिकांच्या जीवनाश्यक अशा वस्तूंवरील कर आता खूप कमी होणार आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या जीएसटी परिषदेच्या बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात आला. निर्मला सीतारामन यांनी बैठकीनंतर याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार आता देशात कोणकोणत्या वस्तू स्वस्त आणि महाग होणार याची माहिती थोडक्यात जाणून घेऊयात.

**काय महाग, काय स्वस्त?**

सुखा मेवा, बदाम, काजू, पिस्ता, खजूर, मिक्स मेवा या वस्तूंवर याआधी १२ टक्के जीएसटी लागायची. पण आता या वस्तूंवर केवळ ५ टक्के जीएसटी लागणार आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना सर्वात मोठा दिलासा मिळाला आहे.

प्रोसेस्ड फूड जसे की पास्ता, नूडल्स, नूडल्स, कॉर्नफ्लेक्स, फ्रूटेड राइस, बिस्किट, केक, पेस्ट्री, पिज्जा ब्रेड, रोटी, चपाती, खाखरा, नमकीन,



भुजिया, मिक्सचर या वस्तूंवर आधी १२ टक्के जीएसटी लागायचा. पण आता या वस्तूंवर केवळ ५ टक्के जीएसटी लागणार आहे.

पॅकेज्ड पेय जसे की नारळाचं पाणी, सोया मिल्क ड्रिंक, फ्रूट जूस आधारित ड्रिंक, दुधापासून तयार झालेले पेय यांच्यावर आतापर्यंत १२ टक्के जीएसटी लागत होतं. पण आता या वस्तूंवर केवळ ५ टक्के जीएसटी लागणार आहे.

शेतकऱ्यांच्या विविध वस्तू, शेतीशी संबंधित वस्तू ज्यांच्यावर आधी १२ टक्के जीएसटी लागायचा तो आता ५ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. तसेच मार्बल, लेदर इत्यादी वस्तूंवरील देखील जीएसटी कमी करण्यात आला आहे.

सिमेंटवर याआधी २८ टक्के जीएसटी आकारला जायचा. पण आता १८ टक्के जीएसटी लावला जाईल.

आरोग्याशी संबंधित उपकरणे आणि ३३ औषधांवर आता जीएसटी लागणार नाही.

चष्मा आणि व्हिजन संबंधित उपकरणांवर आता ५ टक्के जीएसटी लागेल.

हेल्थ इन्शुरन्स, लाईफ इन्शुरन्सवर लागणाऱ्या जीएसटीतही घट झाली आहे. बूट आणि कपड्यांवरच्या देखील जीएसटीत घट करण्यात आली आहे. या वस्तूंवरील जीएसटी १२ टक्क्यांवरुन आता केवळ ५ टक्क्यांवर करण्यात आली आहे.

औषधे, ट्रॅक्टर, तूप, लोणी स्वस्त होणार आहे. त्यांच्यावर आधी १२ टक्के जीएसटी लागत होता. पण यापुढे आता ५ टक्के जीएसटी लागणार आहे.

लक्झरी वस्तू जसे की कार, बाईक आणखी महाग होतील. यावर एक विशेष स्लॅब लावला जाईल. याशिवाय तंबाखू, पान मसाला, फ्लेवर, फ्रूट ड्रिंक आणि इतर पॅकेज्ड पेये महाग होतील. ३५० सीसी पेक्षा जास्त इंजिन असलेल्या बाईक महाग होतील.

## मुंबई उच्च न्यायालयाच्या नवीन संकुलाच्या बांधकामासाठी ३ हजार ७५० कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबईतील वांद्रे - पूर्व येथील उच्च न्यायालयाच्या नवीन संकुलाच्या बांधकामासाठी ३ हजार ७५० कोटी रुपयांची तरतूद करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथे शासकीय वसाहतीतील सुमारे ३०.१६ एकरवर उच्च न्यायालयाचे नवीन संकुल उभारले जाणार आहे. याठिकाणी उच्च न्यायालयाचे हायकोर्ट रुम, न्यायाधीशांची दालने आणि अन्य अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठीची दालने, सभागृह, ग्रंथालय याशिवाय न्यायाधीशांची निवासस्थाने, प्रशस्त वाहनतळ यांसह अनेकविध आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. हा महत्त्वपूर्ण प्रकल्प म्हणून घोषित करण्यात आला असून तो वेळेत पूर्ण केला जाणार आहे.

## संजय गांधी निराधार, श्रावणबाळ योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात हजार रुपयांची वाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई (प्रतिनिधी) : संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात एक हजार रुपयांची वाढ करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या लाभार्थ्यांना दीड हजार रूपये अर्थसहाय्य दिले जात होते. आता ते अडीच हजार रुपये दिले जाईल.

राज्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत निराधार पुरुष, महिला, अनाथ मुले, दिव्यांगातील सर्व प्रवर्ग, निराधार विधवा आदींना दरमहा पंधराशे रुपये अर्थसहाय्य दिले जाते. सध्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेत ४ लाख ५० हजार ७०० आणि श्रावणबाळ योजनेत २४ हजार ३ दिव्यांग लाभार्थी आहेत. या लाभार्थ्यांना आता दरमहा अडीच हजार रुपये अर्थसहाय्य देण्यास मान्यता देण्यात आली. हे अनुदान ऑक्टोबर २०२५ पासून देण्यात येईल. यासाठी आवश्यक ५७० कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली.

**औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रातील राखेच्या वापरासंबंधी धोरणास मान्यता**

महानिर्मिती कंपनीच्या औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रात तयार होणाऱ्या राखेच्या वापरासंबंधीच्या धोरणास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

केंद्र सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या सूचनेनुसार औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रात तयार होणाऱ्या राखेच्या वापराबाबतचे धोरण २०१६ मध्ये निश्चित करण्यात आले होते. केंद्र सरकारच्या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार सदर धोरणात बदल करणे प्रस्तावित होते. त्यानुसार या धोरणास मान्यता देण्यात आली. या धोरणाद्वारे राखेच्या १०० टक्के पर्यावरणपूरक पध्दतीने विनियोग कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. या धोरणाद्वारे विविध घटकांकरिता राख वापरण्यासाठी प्रोत्साहनात्मक सवलती देण्यात येणार आहेत. यामुळे स्थानिक आणि प्रकल्पग्रस्तांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

**अनुसूचित जमातीतील नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आता केंद्राची पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना**

राज्यातील अनुसूचित जमातीतील इयत्ता नववी आणि दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यनिक शिष्यवृत्ती योजनेऐवजी आता केंद्र सरकारची पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात येणार आहे. या प्रस्तावास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. राज्यात जिल्हा परिषदेच्या शाळांमधील अनुसूचित जमातीच्या नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. ही योजना व केंद्र सरकारच्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेशी तुलना केली असता केंद्राच्या योजनेमध्ये शिष्यवृत्तीची रक्कम राज्याच्या योजनेपेक्षा अधिक मिळते. त्यामुळे या विद्यार्थ्यांना केंद्र सरकारची पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. यात शासकीय वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना केंद्र सरकारच्या योजनेतील लाभ दिल्यानंतरची रक्कम वगळून उर्वरित रक्कम वसतीगृह योजनेतून दिली जाणार आहे. ही योजना अनुदानित व शासकीय निवासी आश्रमशाळा, एकलव्य निवासी शाळा तसेच नामांकित शाळा यांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

## मराठा आरक्षणानंतर ओबीसींसाठीही सरकारचं महत्वाचं पाऊल, उपसमिती गठीत; बावनकुळे अध्यक्ष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मराठा आरक्षणासाठी नेते मनोज जरांगे पाटील यांच्यासह लाखो मराठ्यांनी मुंबई गाठली होती. मराठ्यांना ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे ही मागणी जरांगे पाटलांनी लावून धरली होती, तर मराठा समाजही आक्रमक झाल्याचा पाहायला मिळाला. यावर तोडगा काढण्यासाठी नियुक्त केलेल्या उपसमितीने जरांगेंच्या मागण्यांचा अभ्यास केला त्याच पार्श्वभूमीवर सरकारनेही जरांगेंच्या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला आणि मराठा आंदोलनासाठी ठोस पाऊल उचलणार असल्याची हमी मराठा समाजाला दिली. यातच मात्र ओबीसी समाजात मात्र तीव्र नाराजी पसरली आहे. ओबीसी



समाज मराठ्यांचा ओबीसीकरणाला सुरुवातीपासून विरोध करत आहेत, जो सध्या आणखी तीव्र झाला आहे. यामुळे सरकारने ओबीसींसाठीही महत्वाचे पाऊल उचलले आहे.

एबीपी माझा वृत्तवाहिनीने सूत्रांच्या हवाल्याने वृत्त दिले की, सरकार ओबीसींच्या विकासासाठी स्वतंत्र मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करणार आहे. तर चंद्रशेखर बावनकुळे या समितीचे अध्यक्ष असणार आहेत आणि छगन भुजबळ, पंकजा मुंडे यांच्यासह आणखी आठ मंत्री समितीचे सदस्य असणार आहेत. ओबीसी समाजाच्या विरोधानंतर सरकार हे पाऊल उचलताना दिसत आहे. ओबीसींमध्ये अस्वस्थता पसरल्याचे चित्र आहे. यातच मंत्री छगन भुजबळ यांनी मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार एकप्रकारे सरकारच्या निर्णयाला विरोध दर्शवला. यासाठी सरकारने हालचाली सुरु केल्या आहेत. ओबीसींना दिलासा देण्यासाठी सरकार विकासात्मक निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. ओबीसींच्या विकासासाठी उपसमिती गठीत करण्यात येणार आहे. ज्यामध्ये सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासाबाबत कार्यक्रम आखण्यात येणार आहेत. यांसंबंधित योजनांबाबत ही समिती कामकाज पाहणार असल्याचे वृत्त आहे.

भाजपचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे या समितीचे अध्यक्षपद असणार आहे. तर या समितीत भाजपचे चार, राष्ट्रवादीचे दोन आणि शिवसेनेच्या दोन मंत्र्यांचा समावेश असणार आहे. यामध्ये छगन भुजबळ, गणेश नाईक, गुलाबराव पाटील, संजय राठोड, पंकजा मुंडे, अतुल सावे, दत्तात्रय भरणे हे समितीचे सदस्य असतील, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

## पंढरपूरला जाणाऱ्या बसला ट्रकची जोरदार धडक, १६ प्रवासी जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर शहराजवळ असलेल्या बोरामणी गावाजवळ कर्नाटकातील बिदरहून पंढरपूरकडे निघालेल्या बसचा भीषण अपघात झाला आहे. अपघाताची भीषणता इतकी तीव्र होती की, बसच्या एका बाजूच्या भागाचा पूर्णपणे चेंदामेंदा झाला आहे. सुदैवाने या अपघातात मोठी जीवितहानी झाली नाही.१६ प्रवासी जखमी झाले असून ६ प्रवासी गंभीर जखमी आहेत. सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात काही प्रवाशांना उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे .जखमी प्रवाशांमध्ये बिदर (कर्नाटक) तुळजापूर (धाराशिव) आणि सोलापूरचे प्रवासी आहेत. काही प्रवासी खाजगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल झाले आहेत.

कर्नाटक राज्यातील बिदरहून पंढरपूरकडे जाणाऱ्या बसला ट्रकने जोरदार धडक दिली. त्यामध्ये बसमधील प्रवाशांना गंभीर दुखापत झाली आहे. अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघात एवढा भीषण होता की, बसचा एक भाग पूर्णपणे उघडा पडला आहे. या अपघातात १६ प्रवासी जखमी झाले असून यातील ६ जणांची प्रकृती गंभीर असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. ५ ते ६ प्रवाशांची प्रकृती चिंताज-



नक असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. तसेच हे प्रवासी पंढरपूरला दर्शनाला जात असल्याचं सांगण्यात येत आहे.

शासकीय रुग्णालयातील पोलिस चौकीत झालेल्या नोंदीनुसार ७ रुग्णांना उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. शिवकुमार म्हेत्रे (वय ४६, रा. बिदर, कर्नाटक), संजीवनी म्हेत्रे (वय ७०, रा. बिदर, कर्नाटक), श्रावणकुमार शिवाजीराव दाडगे (वय ४१, भालकी, जि. बिदर, कर्नाटक), ज्योती श्रवणकुमार दाडगे (वय ३५, रा. भालकी जि. बिदर, कर्नाटक), रवींद्र रमेश पाटील (वय ४५, रा. जेवळी, ता. लोहारा, ता. तुळजापूर जि. धाराशिव), समीर सत्तार काझी (वय ३३, रा. नळदुर्ग, ता. तुळजापूर, जि. धाराशिव), मोअजन अबूबकर नजरअली (वय ३०, रा. नळदुर्ग, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) हे जखमी प्रवासी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार घेत आहेत. आणखी प्रवासी हे खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहेत.

### भुजबळांची मंत्रिमंडळाच्या बैठकीला दांडी

### मराठा आरक्षणाच्या जीआरबाबत संभ्रम


## ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागत असेल तर त्या विरोधात आम्ही न्यायालयात जाऊ : छगन भुजबळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य सरकारने मराठा आरक्षणावर काढलेल्या जीआरवर त्यांचेच मंत्री छगन भुजबळांनी नाराजी व्यक्त केली आहे. ओबीसी कार्यकर्त्यांनी राज्यभर जिल्हाधिकारी, तहसीलदार यांना निवेदन द्यावं आणि ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लावू नये अशी मागणी करावी असं आवाहन छगन भुजबळांनी केलं. सरकारच्या या जीआरवर आम्हाला संभ्रम आहे, ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागत असेल तर त्या विरोधात आम्ही न्यायालयात जाऊ असंही छगन भुजबळ म्हणाले.

मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर राज्य सरकारने मराठा आरक्षणाचा नवा जीआर काढला. त्यामध्ये हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. या गोष्टीला ओबीसी नेत्यांनी विरोध दर्शवला. राज्य सरकारच्या या निर्णयाविरोधात मंत्री छगन भुजबळांनीही नाराजी व्यक्त केली आणि मंत्रिमंडळाच्या बैठकीवरही बहिष्कार टाकल्याचं दिसून आलं.

छगन भुजबळ म्हणाले की, या जीआर बाबत अद्याप संभ्रम आहे. याबाबात आमच्या नेत्यांनी आणि अभ्यासकांनी, राज्यात



वेगवेगळ्या ठिकाणी निवेदनं दिली आहेत. काही ठिकाणी ओबीसी कार्यकर्त्यांनी उपोषण सुरू केले आहेत. अनेक कायदेतज्ज्ञ, वकील आणि इतरांशी चर्चा करून याची माहिती घेत आहोत. जर आवश्यक असेल तर चर्चा करून येत्या चार दिवसात त्या विरोधात न्यायालयात जाऊ.

या जीआरच्या विरोधात न्यायालयात जाण्याची आमची तयारी असून त्यासाठी ज्या कागदपत्रांची जुळवाजुळवी करावी लागेल ती आम्ही करू असं छगन भुजबळ म्हणाले. राज्यातील कार्यकर्त्यांनी त्या-त्या ठिकाणच्या जिल्हाधिकारी आणि तहसीलदारांना ओबीसींच्या हक्कांवर गदा येऊ देऊ नये अशी निवेदनं द्यावीत. आपले म्हणणे शांतपणे मांडावं. या व्यतिरिक्त जर कुणी उपोषण करत असेल किंवा इतर काही मार्ग पत्करत असेल तर त्या गोष्टी तूर्तास थांबवाव्यात असं भुजबळ म्हणाले.

मुंबईतल्या मराठा आंदोलनामुळे उडालेली धूळ खाली बसत नाही, तोच आता राज्यभरातील ओबीसी समाज आक्रमक झाल्याचं दिसतंय. यातील सर्वांत मोठे हिरो ठरले ते छगन भुजबळ. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठी ते सह्याद्री अतिथीगृहावर पोहोचले खरे, मात्र बैठकीत काही सहभागी झाले नाहीत.

राष्ट्रवादीच्या मंत्रिमंडळपूर्व बैठकीला हजेरी लावून ते निघून गेले. त्यांना मंत्रिमंडळ बैठकीला दांडी मारण्याचं नेमकं कारण विचारण्याचा प्रयत्न माध्यमांनी केला खरा, मात्र भुजबळ काहीही न बोलता निघून गेले. त्यामुळे मग ते नाराज असल्याची आणखीनच चर्चा रंगली. तिथून ते थेट भुजबळ नॉलेज सिटीमध्ये पोहोचले आणि त्या ठिकाणी प्रकाश शेंडगेंसह अनेक ओबीसी नेत्यांसोबत त्यांनी चर्चा केली.


## संपादकीय....

### महत्त्वपूर्ण निर्णय

संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात एक हजार रुपयांची वाढ करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या लाभार्थ्यांना दीड हजार रूपये अर्थसहाय्य दिले जात होते. आता ते अडीच हजार रुपये दिले जाईल. राज्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत निराधार पुरुष, महिला, अनाथ मुले, दिव्यांगातील सर्व प्रवर्ग, निराधार विधवा आदींना दरमहा पंधराशे रुपये अर्थसहाय्य दिले जाते. सध्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेत ४ लाख ५० हजार ७०० आणि श्रावणबाळ योजनेत २४ हजार ३ दिव्यांग लाभार्थी आहेत. या लाभार्थ्यांना आता दरमहा अडीच हजार रुपये अर्थसहाय्य देण्यास मान्यता देण्यात आली. हे अनुदान ऑक्टोबर २०२५ पासून देण्यात येईल. यासाठी आवश्यक ५७० कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली. महानिर्मिती कंपनीच्या औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रात तयार होणाऱ्या राखेच्या वापरासंबंधीच्या धोरणास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. केंद्र सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या सूचनेनुसार औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रात तयार होणाऱ्या राखेच्या वापराबाबतचे धोरण २०१६ मध्ये निश्चित करण्यात आले होते. केंद्र सरकारच्या सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार सदर धोरणात बदल करणे प्रस्तावित होते. त्यानुसार या धोरणास मान्यता देण्यात आली. या धोरणाद्वारे राखेच्या १०० टक्के पर्यावरणपूरक पध्दती-ने विनियोग कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. या धोरणाद्वारे विविध घटकांकरिता राख वापरण्यासाठी प्रोत्स-ाहनात्मक सवलती देण्यात येणार आहेत. यामुळे स्थानिक आणि प्रकल्पग्रस्तांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आ-हेत. राज्यातील अनुसूचित जमातीतील इयत्ता नववी आणि दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यनिक शिष्यवृत्ती योजनेऐवजी आता केंद्र सरकारची पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात येणार आहे. या प्रस्तावास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. राज्यात जिल्हा परिषदेच्या शाळांमधील अनुसूचित जमातीच्या नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. ही योजना व केंद्र सरकारच्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेशी तुलना केली असता केंद्राच्या योजनेमध्ये शिष्यवृत्तीची रक्कम राज्याच्या योजनेपेक्षा अधिक मिळते. त्यामुळे या विद्यार्थ्यांना केंद्र सरकारची पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

# चंद्रभागेतील विष्णुपद मंदिराचं अस्तित्व धोक्यात, निकृष्ट दर्जाचे कामामुळे पहिल्याच पुरात छतावरील प्लास्टर वाहुन गेले

## पंढरपुरातील समाजसेवक गणेश अंकुशराव यांचे गंभीर आरोप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपुरातील चंद्रभागेच्या पात्रात असले-ले विष्णुपद या मंदिराचे संवर्धनाचे मंदिर समिती मार्फत झालेले काम हे संबंधित ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे केले असल्यामुळे नुकत्याच येऊन गेलेल्या पुरात या मंदिराचे छतावर केलेले प्लास्टर वाहून गेले असुन या पुरातन मंदिराचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. असा गंभीर आरोप येथील सम ाजसेवक गणेश अंकुशराव यांनी केला आहे.

मंदिर समिती च्या भ्रष्ट आणि भोंगळ कारभारासंदर्भातील अनेक गोष्टी याआधीही गणेश अंकुशराव यांनी चव्हाट्यावर आणुन आवाज उठवला होता, प्रामुख्याने मंदिराच्या छताला गळती, गोशाळेतील व्यवस्थापनातील त्रुटी, मंदिरातील अस्वच्छता आदींसह विविध मुद्द्यांवर त्यांनी लक्ष वेधले होते.

नुकत्याच येऊन गेलेल्या चंद्रभागेच्या पुरात नदीपात्रातील अनेक मंदिर पाण्याखाली गेली होती. त्यामध्ये प्रत्यक्ष पांडुरंग जेंव्हा पंढरपुरात गायी गोपाळांसह सर्वप्रथम ज्या ठिकाणी आले ते विष्णूपद मंदिरही पाण्याखाली गेले होते. पाणी ओसरल्यावर गणेश अंकुशराव या मंदिराच्या छतावर गेले आणि पाहणी केली असता छतावरचे प्लास्टर वाहुन गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

अतिशय पुरातन असलेलं हे संपुर्ण मंदिर दगडाचं आहे. परंतु मंदिर समितीनं जतन संवर्धन करण्याचे काम करताना आधुनिक वजड यंत्र , मशिनरीज याचा वापर केल्यामुळे व कंत्राटदाराने बोगस निकृष्ट काम केल्यामुळे मंदिरावरच्या स्लॅबची आणि चिरेबंदी तटबंदीची पहिल्याच पुरात दुरावस्था झाली आहे. याकडे वेळीच लक्ष देऊन तातडीने चांगली डागडुजी केली नाही तर या मंदिराच्या अस्तित्वालाच भविष्यात धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी याकडे तातडीने लक्ष घालून बेजबाबदार मंदिर समिती प्रशासन व संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी अन्यथा लोकशाही मार्गाने आम्ही आंदोलन करू! असा इशारा गणेश अंकुशराव यांनी दिला आहे.

# मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे, समृद्धी महामार्ग आणि अटल सेतूवर टोलमाफी, सरकारचा मोठा निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढावा यासाठी मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग आणि अटल सेतू येथून प्रवास करणाऱ्या ई-वाहनांना पूर्ण टोलमाफीचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यामुळे पुणे, पिंपरी-चिंचवड व परिसरातील ई-वाहनांना या निर्णयाचा फायदा होणार आहे.

राज्य सरकारने 'इलेक्ट्रिक वाहन धोरण, २०२१' जाहीर करून, ई-वाहनांच्या वापराला चालना दिली. केंद्र सरकारने यापूर्वीच इलेक्ट्रिक वाहनांचा वेगवान अंगीकार आणि उत्पादन (फेम) ही योजना सुरू केली होती. राज्य आणि केंद्र सरकारने जाहीर केलेल्या इलेक्ट्रिक वाहन धोरणाचा पुण्याने योग्य फायदा घेतला. त्यामुळे ई-वाहन खरेदीचा वेग वाढला. पुण्यात ई-वाहनांची संख्या एक लाखांच्या पुढे गेली. पण, केंद्र सरकारने ई-वाहनांवरील सवलत कमी केली. त्यामुळे गेल्या काही म हिन्यांमध्ये ई-वाहन खरेदी मध्ये घट झाली आहे. त्यामुळे राज्य सरकारने इलेक्ट्रिक वाहन धोरण, २०२१नुसार काही महत्त्वाच्या मार्गावर टोलमाफीचा निर्णय घेतला आहे.

राज्य सरकारने याबाबतचा आद-ेश नुकताच काढला आहे. त्यानुसार मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग, अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतू या मार्गावर प्रवास करणाऱ्या ई-वाहनांना पथकर भरण्याची आवश्यकता राहणार नाही. ई-वाहन वा-परामुळे इंधन खर्चात बचत होणार आहे; तसेच प्रदूषण नियंत्रणास मोठी मदत मिळेल, असा सरकारचा उद्देश आहे. या निर्णयाम ुळे ई-वाहन खरेदी करणाऱ्यांचा प्रवास खर्च आणखी कमी होईल. परिवहन विभागाकडून टोलमाफी योजनांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक सम न्वय केला जाणार आहे. त्यासाठी सर्व संबंधित महामार्ग प्राधिकरणांना सूचना देण्यात आल्या आहेत.



राज्यात साधारण सहा लाखांच्याजवळ ई-वाहनांची नोंदणी झाली आहे. त्यामध्ये पुण्यात ई-वाहनांची संख्या सव्वा लाखांवर गेली आहे. पुणे पिंपरी-चिंचवडमधून ई-कार, ई-बस मुंबईला मोठ्या प्रमाणात धावतात. व राज्यामध्ये पुण्यात ई-कार खरेदी करणाऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. त्यामध्ये खासगी व्यक्तींसोबत व्यावसायिक ई-कारचा वाढल्याचे दिसून येत आहे.

# नग्न अवस्थेत चढलेल्या अनोळखी इसमाला खाली उतरवताना मारहाण; मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : छत्रपती शिवाजी महाराज चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या चबुतऱ्यावर एका अनोळखी (अंदाजे वय ४० वर्षे) इसमाने नग्न अवस-थेत चढून गोंधळ घातला. त्यास खाली उतरवताना मारहाण झाल्याने त्याचा मृत्यू झाला.

फिर्यादी पो.कॉ. अतुल लक्ष्मण रिकीबे (फौजदार चावडी पोलीस ठाणे) यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी सुरज सुरेश सुरवसे (रा. मराठा वस्ती, भवानी पेठ) याने लाकडाने मारहाण केली तर आरोपी प्रशांत दत्तात्रय मरगणे (रा. अवंती नगर, सोलापूर) याने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यामुळे इसम खाली पडून गंभीर जखमी झाला आणि जागीच मरण पावला. या प्रकरणी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# पडघ्यात गणपती गौरींना भक्तीमय वातावरणात निरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : पडघ्यात गणपती बरोबर गौराईलाही भक्तिमय वातावरणात निरोप देण्यात आला. चतु-र्थीला मोठ्या उत्साहात घरोघरी विराजमान झालेल्या लाडक्या गणरायाला पाच दिवसांनंतर अनेक ठिकाणच्या गावानजीक असलेल्या गणेश घाटावर गणेश भक्तांनी मोठी गर्दी झाली होती. भक्तीमय वातावरणात निरोप देण्यात आला.

'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषाने आणि जड अंतः करणाने गणेशभक्तांनी बाप्पाला निरोप दिला. पडघा परिसरातील गणेश घाट येथे रात्री उशिरापर्यंत गणेशमूर्तींचे विसर्जन सुरू हो-ते. गणेशोत्सवाच्या निमित्ताने




संपूर्ण पडघा परिसर भक्तिमय झाले होते. विसर्जनाची तयारी दुपारपासूनच सुरू होती.

पडघ्यात ढोल ताशाच्या निनादात गणेश मूत-ींचे विसर्जन करण्यात आले. पडघे परिसरातील विविध ठिकाणी गणेश घाटावर गणेश भक्तांनी गर्दी केली होती. तसेच कुठल्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी पडघा पोलीस स्टेशनच्या माध्यम ातून विविध ठिकाणी पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता व तसेच विसर्जनस्थळी पडघा ग्रामपंचायतिचे कर्मचारी उप-स्थित होते.

तर गौरी आणि गणपतीच्या मूर्ती डोक्यावर घेऊन वाजत गाजत विसर्जनासाठी नेतांना यावेळी गणेश भक्तांनी पारंपरिक गीते, टाळ आणि मृदूंगाच्या साथीने नाचत , गाजत मि रवणूका काढल्या होत्या. पडघा परिसरात लहान थोरांसह मिरवणुकींचा उत्साह पाहायला मिळाला.

# नवी मुंबई पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांकरिता संविधान परिचय कार्यशाळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी मुंबई : ऐरोली येथील नवी मुंबई महानगरपालिकेच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबडेकरस्मारकातगणेशोत्सव-ापूर्वी नुकतीच नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत विविध पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी, कर्मचारी यांचेकरिता 'संविधान परिचय कार्यशाळा' मोठ्या उत्साहात पार पडली.



भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त संपूर्ण देशभरात 'संविधान अमृत महोत्सव' साजरा होत आहे. या अमृत महोत्सवी संविधान पर्वाच्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेच्या वती-ने आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई संविधान साक्षर होण्याच्या दृष्टीने 'घर घर संविधान' अभियानांतर्गत वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत आहे.

या अंतर्गत महानगरपालिका अधिकारी, कर्मचारीवृंदासाठी परिमंडळ व विभाग कार्यालयनिहाय संविधान परिचय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. त्याचाच पुढचा टप्पा म्हणजे नवी मुंबई पोलिस आयुक्तालयांतर्गत असलेल्या विविध पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी व अधिकारी यांच्याकरिता पोलीस आयुक्त श्री.मिलिंद भारंबे यांच्या मान्यतेनुसार संविधान परिचय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी माजी निवडणूक आयुक्त श्री.जे.एस.सहारीया यांनी उपस्थित पोलीस अधिकारी, कर्मचारी यांना संविधानातील म ूल्ये, नागरिकांचे हक्क व कर्तव्य तसेच कायद्याची अंमलबजावणी करताना पोलीस दलाची भूमि का या विषयावर अभ्यासपूर्ण माहिती देत संविधानाचे महत्व विषद केले.

या शिबिरापूर्वी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामधील बेलापूर ते दिघा विभागातील साधारणत: ८०० महिला बचत गटांतील सदस्यांसाठी विभागनिहाय संविधान परिचय कार्यशाळांचे आयोजन करून संविधान साक्षर करण्यात आले. समाजातील विविध घटकांपर्यंत संविधानाचे महत्व आणि माहिती पोहचवून नवी मुंबई हे संविधान साक्षर शहर करण्याच्या संकल्पपूर्तीसाठी या कार्यशाळांचे ठिकठिकाणी आयोजन केले जात आहे.

**गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकार्डमध्ये मेट्रोच्या कामठी मार्गावरील डबल डेकर उड्डाणपुलाची नोंद; मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत वर्ल्ड रेकार्डचे प्रमाणपत्र**

# जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांचे शहर म्हणून नागपूरची नवी ओळख : मुख्यमंत्री फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : महामेट्रोने अल्पा-वधीत जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांचा विकास केल्यामुळे नागपूर या शहराला जागतिक ओळख मिळाली आहे. महामेट्रोने कामठी मार्गावरील सर्वात लांब डबल डेकर उड्डाणपुलाची निर्मिती केली असून या पुलाची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकार्डमध्ये नोंद घेतली आहे. जागतिक दर्जाच्या या पुरस्कारामुळे नागपूरची जगातील उत्कृष्ट पायाभूत सुविधांचे शहर म्हणून नवीन ओळख निर्माण झाली असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. या जागतिक पुरस्काराबद्दल महामेट्रोच्या अधिकाऱ्यांना त्यांनी यावेळी शुभेच्छा दिल्या.




रामगीरी येथे मुख्यमंत्र्यांच्या विशेष उपस्थितीत गिनिज वर्ल्ड रेकार्डचे भार-तातील प्रतिनिधी स्वप्नील डोंगरीकर यांनी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांना गिनिज वर्ल्ड रेकार्डमध्ये नोंद झाल्याचे प्रम ाणपत्र प्रदान केले.

कामठी मार्गावरील डबल डेकर व्हायाडक्ट (मेट्रो) हा जगातील डबल डेकर व्हायाडक्ट आहे. मेट्रो व हायवे वाहतुकीसाठी ५.६३७ कि.मी. लांबीचा सिंगल कॉलम पिलरवर उभा असून हा स्थापत्य कलेचा अद्भुत नमुना आहे.

यापूर्वी छत्रपतीनगर येथील ३.२ कि.मी. लांबीच्या डबल डक्ट उड्डाणपुलाच्या निर्मितीसाठी जागतिक स्तरावर नोंद घेण्यात आली होती. वास्तुकलेच्या या निर्मितीमुळे संत्र्यांच्या शहरासोबतच पायाभूत सुविधांचे शहर म्हणून नवीन ओळख मिळाली आहे. या पुरस्काराने नागपूरचा गौरव जागतिक स्तरापर्यंत पोहचला आहे. या डबल डेकर पुलाच्या निर्मितीसोबतच कामठी मार्गावर रेल्वे, महामार्ग वाह-तूक तसेच मेट्रो वाहतुकीसाठी जगात प्रथमच अशा प्रकारचा उड्डाणपूल तयार करण्यात आला आहे. हे जागतिक अभियांत्रिकीमधील आश्चर्य आहे. या पुलासाठी १ हजार ६५० टन स्टीलचा वापर करण्यात आला आहे.

जगातील पहिल्या सर्वात लांब डबल डेकर व्हायाडक्ट पुलाचे सर्व देशांना आकर्षण आहे. प्रत्यक्ष निर्मितीसंदर्भातील माहिती घेण्यासाठी अभियांत्रिकी व वास्तुकलेतील तज्ज्ञ भेट देऊन पाहणी करत आहे. अशा प्रकारच्या डबल डेकर पुलांची निर्मिती करणारे महामेट्रो व नागपूर हे पायोनिअर असल्याचे महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी सांगितले.

प्रारंभी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक हर्डीकर यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे पुष्पगुच्छ देवून स्व-ागत केले. त्यानंतर महामेट्रोतर्फे बांधण्यात आलेल्या भारतातील सर्वात लांब डबल डेकर मेट्रो व्हायाडक्ट या पुलाच्या निर्मितीसंदर्भातील चित्रफित दाखविण्यात आली. तंत्रज्ञानाचा अतुलनीय वापर करुन उड्डाणपुलावर गड्डीगोदाम, कडबीचौक, इंदोरा चौक, नारी रोड, ऑटोमोटीव्ह चौक ही पाच मेट्रो स्थानके बांधण्यात आली आहे. हा उड्डाणपुल चार पदरी असून पहिल्या स्तरावर महामार्ग, दुसऱ्या स्तरावर मेट्रो आणि जमीन स्तरावर आधीच अस-लेला महामार्ग आहे. या उड्डाणपुलाम ुळे कामठी मार्गावरील प्रचंड वाहतूक कोंडीतून नागरिकांना दिलासा मिळाला आहे. यापूर्वी छत्रपती चौकाचा सम ावेश असलेल्या उड्डाणपुलाचा देखील गिनिज वर्ल्ड रेकार्डमध्ये समावेश करण्यात आला आहे.

यावेळी महामेट्रोचे संचालक अनिलकुमार कोकाटे , प्रकल्प संचालक राजीव त्यागी, कार्यकारी संचालक नरेश गुरबानी, महाव्यवस्थापक यतिन राठोड, मुख्य प्रकल्प व्यवस्थापक एन. व्ही. पी. विद्यासागर, प्रकल्प संचालक प्रकाश मुदलियार आदी अधिकारी तसेच गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकार्डचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# नळदुर्ग येथील व्यापारी गणेश मंडळाचे कार्य कौतुकास्पद : डॉ. चंचला बोडके

## गणेशोत्सवानिमित्त सर्वरोग निदान शिबीर संपन्न; पत्रकार आयुब शेख हे नेत्रदान तर सामाजिक कार्यकर्त्या कल्पना गायकवाड यांनी केला अवयव दानाचा संकल्प

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग येथे नेत्र तपासणी व मोफत चष्मे वाटपपाचा कार्यक्रम आयोजित करून खऱ्या अर्थाने सामाजिकदृष्ट्या खुप मोठे कार्य केले आहे. त्यांचे हे कार्य कौतुकास्पद व समजपयोगी असल्याचे नळदुर्ग येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या अधीक्षक डॉ. चंचला बोडके यांनी म्हटले आहे.

नळदुर्ग येथील व्यापारी गणेश मंडळाने यावर्षी वृक्ष लागवडी सह विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करून खऱ्या अर्थाने गणेशोत्सव कसा साजरा करायचा हे दाखवुन दिले आहे. व्यापारी गणेश मंडळाच्या या कार्याचे सर्व स्तरातुन कौतुक होत आहे.



नळदुर्ग येथे व्यापारी गणेश मंडळाच्या वतीने सर्वरोग निदान शिबीर, नेत्र तपासणी व मोफत चष्मे वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. हा कार्यक्रम मल्लिकार्जुन मंदिराच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य शिवाजीराव मोरे हे होते. या कार्यक्रमाचे उदघाटन सामाजिक कार्यकर्ते डॉ. सिद्रामप्पा खजुरे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन नळदुर्ग येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या अधीक्षक डॉ चंचला बोडके, पत्रकार विलास येडगे, लतिफ शेख, व्यापारी मंडळाचे अध्यक्ष सुभाष कोरे व सामाजिक कार्यकर्त्या कल्पना गायकवाड व व्यापारी मंडळाचे माजी अध्यक्ष सतिश पुदाले हे उपस्थित होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते गणपतीची पुजा करण्यात आली. यानंतर शहरातील मुख्य चावडी चौकात चावडीच्या इमारतीसमोर डॉ. चंचला बोडके व डॉ. सिद्रामप्पा खजुरे यांच्या हस्ते वृक्ष लावण्यात आले.

यावेळी बोलतांना डॉ. चंचला बोडके यांनी म्हटले की, गणेशोत्सवाच्या माध्यमातुन व्यापारी गणेश मंडळाने गरीब व गरजु नागरीकांसाठी जे मोफत सर्वरोग निदान शिबीर आयोजित केले आहे ते कौतुकास्पद आहे. शहरातील नागरीकांनी उपजिल्हा रुग्णालयात सुरु असलेल्या विविध आरोग्य सुविधांचा लाभ घ्यावा. त्याचबरोबर आज नागरीकांनी अवयव दान करण्यासाठी पुढे यावे आपला मृत्यु झाल्यानंतर आपल्या अवयामुळे कुणाला जीवदान मिळत असेल तर यापेक्षा पुण्याचे दुसरे कुठले काम नाही. आज व्यापारी गणेश मंडळाप्रमाणेच शहरातील इतर गणेश मंडळानीही अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन करावे असेही शेवटी त्यांनी म्हटले आहे.

**नळदुर्ग येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या अधीक्षक डॉ. चंचल बोडके यांनी नागरीकांनी अवयवदान करण्यासाठी पुढे यावे असे आवाहन केले होते. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत नळदुर्ग येथील पत्रकार आयुब शेख यांनी नेत्रदान तर सामाजिक कार्यकर्त्या कल्पना गायकवाड यांनी संपुर्ण अवयवदान करण्याचा निर्णय घेतला आहे. यावेळी डॉ. चंचल बोडके यांच्या हस्ते आयुब शेख व कल्पना गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला.**

यावेळी डॉ. सिद्रामप्पा खजुरे, शिवाजीराव मोरे व डॉ. आनंद काटकर यांनीही आपले मनोगत व्यक्त करतांना व्यापारी गणेश मंडळाच्या या समजपयोगी कार्याचे कौतुक करून व्यापारी गणेश मंडळाने हे कार्य असेच पुढेही सुरु ठेवावे असे म्हटले आहे.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांनी केले तर आभार व्यापारी मंडळाच्या सदस्या कल्पना गायकवाड यांनी मानले.

व्यापारी गणेश मंडळाने आयोजित केलेल्या सर्वरोग निदान शिबीर, नेत्र तपासणी व मोफत चष्मे वाटप कार्यक्रमास नागरीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला या शिबिराचा ३५० पेक्षा जास्त नागरीकांनी लाभ घेतला. यामध्ये १५० नागरीकांची नेत्र तपासणी करुन त्यांना मोफत चष्मे देण्यात आले तर २०० पेक्षा जास्त नागरीकांची आरोग्य तपासणी करुन त्यांना औषध देण्यात आले.

या सर्वरोग निदान शिबिरात उपजिल्हा रुग्णालयातील डॉ. वैभव कवळे, डॉ. अभिजित बागल यांनी नागरीकांची आरोग्य तपासणी त्यांना औषधे दिली. तर डॉ. आनंद काटकर यांनी नेत्र तपासणी करुन नागरीकांना मोफत चष्मे देण्याचे काम केले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी व्यापारी गणेश मंडळाचे अध्यक्ष सुभाष कोरे, शहर व्यापारी मंडळाचे अध्यक्ष सतीश पुदाले, व्यापारी गणेश मंडळाचे मुकुंद नाईक,दयानंद स्वामी, संतोष मुळे,राजेंद्र महाबोले, मल्लिनाथ शिरगुरे, वैजनाथ कोरे, कलप्पा कलशेट्टी, शंतनु डुकरे, संदीप सुरवसे, अतुल हजारे, सुनिल गव्हाणे, सुजित बिराजदार, दत्ता गव्हाणे यांच्यासह व्यापारी गणेश मंडळाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परीश्रम घेतले.

# गणेशोत्सव काळात विजेचा लपंडाव सुरू; चाकरमान्यांमध्ये निराशा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लांजा/केतन भोज : तालुक्याच्या ग्रामीण भागात गौरी-गणपती सणाच्या अनुषंगाने सर्वत्र आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण असते.यंदा मात्र महावितरणकडून वारंवार विद्युत पुरवठा खंडित केला जात आहे.यामुळे श्री गणेशभक्तांच्या आनंदावर आता विरजण पडले आहे.आरतीच्या वेळेलाच हमखास वीज गायब होते.यामुळे मोठा संताप व्यक्त केला जात असून,ऐन सणासुदीच्या काळात विजेचा लपंडाव सुरू आहे.यामुळे यंदा घरगुती गणेशोत्सव गौरी सजावट करणार्या महिलांमधून तसेच चाकरमानी ग्रामस्थांकडून महावितरण कंपनीच्या विरोधात नाराजीचा सूर उमटत आहे.याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व महावितरणचे प्रमुख अधिकारी यांनी लक्ष घालून ग्रामीण भागातील विद्युत पुरवठा सुरळीत सुरू ठेवावा,अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते केतन भोज यांच्याकडून केली गेली आहे.तालुक्यात श्री गणरायाचे आगमन मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात होत असते. सर्वत्र गणरायाची पूजाअर्चा होत आहे. त्याठिकाणी दैनंदिन पूजा-आरती महाप्रसाद व इतर धार्मिक कार्यक्रम भजन तसेच तालुक्यातील गावात कोकणातील प्रसिद्ध लोककला कलगी तुरा आयोजित केले जातात.दरम्यान कार्यक्रमाच्या वेळेलाच लोड शेडिंगच्या नावाखाली विद्युत पुरवठा खंडित केला जातो प्रामुख्याने रात्रीच्या आरतीच्या वेळेला अनेकदा विद्युत पुरवठा खंडित झाला असल्याबाबत चाकरमानी श्री गणेश भक्तांच्या तक्रारी आहेत.यासह सर्वत्र गौरी-गणपतीनिमित्त घरामध्ये महिला मंडळाकडून मोठ्या प्रमाणात सजावटीचे कार्यक्रम केले जातात.यामध्ये विजेवर चालणार्या अनेक उपकरणे याचा वापर केला जातो.दरम्यान,कोणतीही कल्पना न देता सणासुदीच्या काळात वारंवार विद्युत पुरवठा खंडित केला जात असल्यामुळे नाहक त्रास सहन करावा लागत आहे. वीज नियामक मंडळ ज्याप्रमाणे लाईट बिल उशिरा भरल्यास दंडात्मक कारवाई करते,त्याप्रमाणे विद्युत पुरवठा सुरळीत सुरू ठेवण्यासाठी वरिष्ठ प्रशासनाने लक्ष घालावे.यामधून नागरिकांना वेळेवर विद्युत पुरवठा सुरू ठेवावा,अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते केतन भोज यांच्याकडून होत आहे.ग्रामीण भागाला विद्युत पुरवठा करणार्या मेनलाईनवर लोड येत आहे.असे कारण पुढे करत,महावितरणकडून ग्रामीण भागातील विद्युत पुरवठा वारंवार खंडित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.कोणतीही पूर्वकल्पना न देता,वारंवार विद्युत पुरवठा खंडित होत असल्याने महावितरणचा कारभार रामभरोसे झाला आहे.यावर कोणाचेही नियंत्रण नसल्याने हा प्रकार घडत असल्याच्या तक्रारी सोशल मीडियावरून व्यक्त होत आहेत.

तरी याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष घालून ग्रामीण भागातील विद्युत पुरवठा सुरळीत सुरू ठेवावा,किमान सणासुदीच्या काळामध्ये तरी वीज सुरळीत करण्यात यावा अशी मागणी जोर धरत आहे.

# विद्यार्थ्यांसाठी शिक्षकांनी सर्वतोपरी योगदान द्यावे : दत्तात्रय जोंधळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी : महाराष्ट्र शिक्षण संस्था संचलित न्यू इंग्लिश स्कूल,पालखेड येथे दि २ रोजी महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे सचिव/कार्याध्यक्ष दत्ताभाऊ जोंधळे यांनी सदिच्छा भेट दिली,



याप्रसंगी दत्ताभाऊ जोंधळे यांनी पालखेड विद्यालयाच्या प्रगतीचा उंचावणारा आलेख पाहून समाधान व्यक्त केले, असून..... मार्केटिंगच्या जमान्यात असणाऱ्या गोष्टींचाही विचार करावा,विद्यार्थ्यांचा एकही मिनिटं शिक्षकाने वाया घालवू नये,प्रत्येकाने आत्मपरीक्षण करून स्वतःला विचारावे की आपण आज विद्यार्थ्यांना काय दिले? याबाबतीतही जागृत रहावे,तसेच विद्यालयाच्या इमारतीचे रंगकाम,नूतन ऑफिस स्थलांतराची पाहणी केली.,शाळेचे नवीन प्रवेश,राबविण्यात येणारे विविध उपक्रम,भौतिक सुविधा,अध्यापनातील प्रामाणिकता यांबाबत विस्तृत आढावा घेऊन शिक्षकांनी आपली आचारसंहिता जपून विद्यार्थ्यांसाठी शिक्षकांनी सर्वतोपरी योगदान द्यावे असे प्रतिपादन दत्तात्रय भाऊ जोंधळे यांनी केले.

यानंतर महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष निवृत्ती थेटे यांनी विद्यार्थ्यांची गुणवत्ता,शालेय शिस्त,कामकाजाचे वेळेत नियोजन याबाबत मनोगतातून सूचित केले,

याप्रसंगी मुख्याध्यापक अशोक शेळके यांनी विद्यालयाच्या बाबतीत असणाऱ्या सर्व बाबींचा उलगडा आपल्या प्रास्ताविकात केला,

यावेळी विद्यालयाच्या वतीने महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष निवृत्ती थेटे,कार्याध्यक्ष/सचिव दत्ताभाऊ जोंधळे, पुंजाहरी दिघे आदींचा शाल, पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला.

यावेळी मुख्याध्यापक अशोक शेळके, निलेश गवांदे, दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे, सुनंदा दुर्धवळे, संजय लव्हांगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, किरण थेटे, सागर जाधव, राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावन जाधव, संजय कोकतरे, कविता ढोमसे,सारिका पवळे, राहुल दवते, सुरेश गांगुर्डे, रामदास पवार, नदीम तांबोळी आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सावन जाधव यांनी तर आभार दत्तात्रय पगार यांनी मानले.

# सचिन भोईर यांना मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानित




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पहारे (सुपेगांव) चे सुपुत्र प्राध्यापक सचिन अशोक भोईर यांना युनिव्हर्सिटी ऑफ तोलोसा, मेक्सिको या नामांकित विद्यापीठातून मानद डॉक्टरेट (विद्यावाचस्पती) या उच्च आणि सन्मानाच्या पदवीने गौरविण्यात आले आहे. सोलापूर येथे एका भव्यदिव्य व दिमाखदार अशा सोहळ्यात अनेक नामवंत व्यक्तींच्या हस्ते प्रा..सचिन अशोक भोईर यांचा सन्मान करण्यात आला. प्रा. सचिन अशोक भोईर सारख्या एक विधीतज्ञ, असून ते एक सामाजिक कार्यकर्ते म्हणून देखिल काम करतात. समाजिक क्षेत्रात त्यांचे मोलाचे योगदान आहे. तर भिवंडी तालुक्यातील शेतकरी उन्नती मंडळ संचलित अनंत लक्ष्मण पाटील शिक्षक कनिष्ट महाविद्यालय काल्हेर या नामांकित संस्थेमध्ये मागील १५ वर्षांपासून कार्यरत आहेत. अनेक व्याख्याने,सभा,विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व समुपदेशन असे अनेक उपक्रम ते राबवित असतात.तर भोईर यांना डॉक्टरेट मिळाल्याबद्दल परिवार आणि पंचकृषी मधील नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.शाळेचे अध्यक्ष राजू पाटील यांनी सचिन भोईर यांचे अभिनंदन केले असून विविध स्तरावरून सचिन भोईर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# कृषी महाविद्यालयाच्या सहयोगी अधिष्ठातापदी पिंपळे गावचे सुपुत्र डॉ. शैलेंद्र शंकरराव कांबळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ विनायक गायकवाड : कोल्हापूर येथील राजे छत्रपती शाहू महाराज कृषी महाविद्यालयाच्या सहयोगी अधिष्ठातापदी पुरंदर तालुक्यातील पिंपळे गावचे सुपुत्र डॉ. शैलेंद्र शंकरराव कांबळे रुजू झाले आहेत. विशेष म्हणजे पशुसंवर्धन आणि दुग्धशास्त्र विषयातील तज्ज्ञ असणारे डॉ. कांबळे हे याच महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत.

डॉ. कांबळे यांनी त्यांचे पदव्युत्तर शिक्षण महात्मा फुले कृषी विद्यापीठातून पूर्ण करून 'पशुपैदास' या विषयामध्ये प्रथम श्रेणीतून आचार्य पदवी प्राप्त केली आहे.



कोल्हापुरातील कृषी महाविद्यालयाच्या १९८५ च्या बॅचचे असलेले विद्यार्थी डॉ. शैलेंद्र कांबळे यांनी कनिष्ठ संशोधन सहायक पदावरून महात्मा फुले कृषी विद्यापीठातील आपली कारकीर्द सुरू केली. महात्मा फुले कृषी विद्यापीठाद्वारे विकसित फुले त्रिवेणी तिहेरी संकरित गायीच्या विकसनामध्ये त्यांचा महत्त्वाचा वाटा राहिला.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे कार्यरत असताना लाल सिंधी गायीवरील संवर्धन आणि संशोधनामध्ये तसेच कोल्हापुरातील शेंडा पार्क येथे असलेल्या पंढरपुरी म्हशीच्या संवर्धन व संशोधन प्रकल्पामध्ये त्यांचे योगदान राहिले आहे. त्यांना आतापर्यंत सहा आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदांमध्ये उत्कृष्ट संशोधन सादरीकरणासाठी पारितोषिके प्राप्त झाली आहेत. त्यांनी कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष म्हणूनही काम पाहिले आहे.

## काकासाहेबनगर महाविद्यालयात कौशल्य विकास कार्यशाळा संपन्न

# संधीचे सुवर्णसंधीत रुपांतर करा : अश्विनी टिळक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : प्रत्येकामध्ये काही ना काही कौशल्य दडलेले असते. ते शोधून त्याचा विकास केल्यास व्यक्तिमत्त्वात आमूलाग्र बदल घडतो आणि त्यातून समाजाच्या प्रगतीलाही हातभार लागतो. अनेकदा संधी आपल्या दारात येऊन ठकठक करते; त्या संधीचे सुवर्णसंधीत रुपांतर करणे हे आपल्याच हातात असते. विद्यार्थ्यांनी आपल्या गुणांना ओळखले पाहिजे, असे प्रतिपादन महिंद्रा प्राईड संस्थेच्या प्रशिक्षक अश्विनी टिळक यांनी केले.

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ कला, वाणिज्य, विज्ञान व संगणकशास्त्र महाविद्यालय, काकासाहेबनगर येथे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल व महिंद्रा प्राईड यांच्या संयुक्त विद्यमाने सात दिवसांची कौशल्य विकास कार्यशाळा पार पडली. त्यावेळी त्या बोलत होत्या. या कार्यशाळेत ३९ विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.




महिंद्रा प्राईड यांच्या वतीने मुलींसाठी घेण्यात आलेल्या या कार्यशाळेत इंग्रजी भाषेतील संवादकौशल्य, आत्मविश्वास वृद्धी, सामाजिक जाणीव व जबाबदार नागरिकत्व, रोजगारक्षमता वाढवणे तसेच नोकरीत यशस्वी होण्यासाठी आवश्यक कौशल्ये यावर भर देण्यात आला.

या कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. पी. के. शहाबादकर यांच्या हस्ते झाले. तर समारोप डॉ. आर. के. दातीर यांच्या उपस्थितीत पार पडला. उद्घाटन व समारोप कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रभारी प्राचार्य डॉ. अतुल गवारे यांनी भूषविले. त्यांनी विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शनही केले.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन विद्यार्थिनींनी केले. अतिथी परिचय, आभारप्रदर्शन व कार्यशाळेचे संयोजन डॉ. अरुण ठोके यांनी केले. त्यांना प्रा. काजल वाघ, प्रा. सुनिता शिरसाठ व प्रा. एम. एन. आहेर यांनी सहाय्य केले. उद्घाटन व समारोप कार्यक्रमास आय.क्यू.ए.सी. समन्वयक प्रा. मिलिंद पवार, प्रा. शीतल जगताप, प्रा. वैशाली शिंदे, प्रा. मुक्ता मोरे यांच्यासह प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सहकार शिरोमणी बचाव समितीच्या शिष्टमंडळाने कारखान्यावर जाऊन घेतली भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : कारखाना भाडेतत्त्वावर देऊ नये अशी विनंती केली व सद्यस्थितीची माहिती मागितली, सहकार शिरोमणी कारखाना हा खरोखरच भाडेतत्त्वावर देण्यासंदर्भात काही तोंडी बोलली किंवा कागदोपत्री प्रक्रिया राबवली गेली आहे काय? या गोष्टीचा खुलासा करण्याची चेअरमन कल्याणराव काळे यांनी करावा? अशी मागणी केली असता कार्यकारी संचालक घोगरे नियाबाबत तोंडी बोलणे सुरू असल्याची कबूल केले.



सभासदांनी कारखाना चालवण्यासाठी त्यांना जबाबदारी दिलेली आहे. परंतु त्या सभासदांना अंधारात ठेवून कारखाना कुठल्यातरी खाजगी उद्योजकांच्या घशात घालण्याचा कट कारस्थान सभासदांच्या अप्रत्यक्षपणे सुरू असेल तर त्याबाबतची माहिती सभासदांना देणे गरजेचे आहे. मागील वर्षीच ऊस बिल थकीत आहे, कामगारांची पगार थकीत आहेत, कामगारांच्या फंडाच्या रकमा थकीत आहेत, तोडणी वाहतूकदाराची बिल थकीत आहेत, मग १४६ कोटी रुपये महाराष्ट्र शासनाने मागच्या वर्षी यांना दिले १.२५ लाख टनाचे मागील वरची गाळप झाले त्या गाळपापासून जी साखर व उपपदार्थ तयार झाले, बग्यास, मोलिसिस, तयार झाली या सगळ्यांचा जर हिशोब केला तर हे सर्व पैसे जात आहेत तरी कुठे? ज्यावेळेस तुम्ही शासनाची तखाने जे कर्ज घेतले ते कर्ज या लोकांची देणे भागवण्यासाठी म्हणून घेतले होते पैसे आले आणि पैसे संपले ही मात्र या लोकांची देणेही आता तशीच आहेत मग नेमके ते पैसे गेले कुठे? असा देखील खुलासा त्यांनी करावा.

कर्ज मागणी ज्या कामासाठी केली होती त्याच कामासाठी वापरणे बंद कारक आहे. पैसे तर संपलेत मग ते पैसे त्यांनी कुठे खर्च केले त्याबाबत स्पष्टपणे उलगडा होणे आवश्यक आहे. सभासद हा या संस्थेचा मालक आहे आपल्याला कारखाना चालवण्यासाठी विश्वस्त म्हणून जबाबदारी दिलेली आहे. याचा अर्थ कारखाना टिकवण्यासाठी किंवा कारखाना दुसऱ्याला चालवण्यासाठी म्हणून आपली नेमणूक झालेली नाही. याबाबत निश्चित माहिती कळायला सोय नाही. पण गेल्या महिन्यापासून जोरदार चर्चा आहे तर हा संभ्रम दूर व्हावा याबद्दल खुलासा करण्याची संपूर्ण जबाबदारी ही चेअरमन म्हणून कल्याणराव काळे यांची आहे. त्यावर संचालक सुरेश देठे यांनी याबाबत मीटिंगमध्ये कोणत्याही ठराव अद्याप झाला नसल्याचे सांगितले व चेअरमन यांच्याशी चर्चा करून दोन दिवसात संचालक मीटिंग घेऊन याबाबत खुलासा करू असे सांगितले.

यावेळी माजी संचालक दीपक पवार, नामदेव ताड, ज्ञानेश्वर खरडकर, नंदकुमार बागल दीपक गवळी, विठ्ठल चे संचालक धनंजय काळे, प्रकाश देठे, बाबा काळे धोंडीराम घोलप विलास देठे, रामचंद्र ढोबळे, बंडू हजारे, रावसाहेब निकम, हनुमंत सोनवणले आधी जण उपस्थित होते.

# मराठा आरक्षणाचे जनक देवेंद्र फडणवीस : जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार सावंत

## मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीला देवेंद्र फडणवीस यांचा सकारात्मक प्रतिसाद



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्रात मराठा समाजाला आर्थिक आणि सामाजिक मागासलेपणाच्या आधारावर शिक्षण व नोकरीमध्ये आरक्षण मिळावे, अशी मागणी गेल्या अनेक वर्षापासून सातत्याने पुढे येत आहे मराठा आरक्षणाचा लढा आजचा नाही १९८० च्या दशकापासून आरक्षणाची मागणी होत आहे. या काळात शरद पवार तब्बल चार वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. उद्धव ठाकरे एकदा मुख्यमंत्री होते. पण त्यांनी आपल्या सत्ता काळात आरक्षण का दिली नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार सकारात्मक आहेत. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनीच मराठा समाजाला दोन वेळा आरक्षण मिळवून दिल्याने मराठा आरक्षणाचे जनक देवेंद्रजी फडणवीस हेच आहेत, असे मत भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार सावंत यांनी व्यक्त केले,

२०१४ मध्ये भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीकडे केवळ सहानुभूतीपूर्वक न पाहता सकारात्मक प्रतिसाद दिला. २०१८ मध्ये त्यांनी मराठा समाजाला सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी) प्रवर्गातून विधिमंडळाच्या माध्यमातून एक मताने १६ टक्के आरक्षण मिळवून दिले होते. त्यानंतर मात्र राज्यात २०१९ मध्ये सत्तांतर झाले आणि राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आले. या सरकारच्या कारकीर्दीत मराठा आरक्षणाच्या लढ्याला आवश्यक ती गती न मिळाल्याने, पाच मे २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयाने, हे आरक्षण ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडत असल्याचे सांगून ते रद्द केले, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी मराठा समाजाला आरक्षण देण्याची काम केले, शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी ते आरक्षण घालवण्याची पाप केले, आरक्षण कोर्टात न टिकल्या मागे शरद पवारांनी उद्धव ठाकरे यांचा हात आहे.

जून २०२२ मध्ये राज्यात पुन्हा एकदा सत्तांतर झाले व राज्यातील महायुतीचे सरकार आले. पूजा सरकारने मराठा आरक्षणाच्या मुद्दा प्रभावीपणे हाती घेतला व २०२४ च्या फेब्रुवारी महिन्यात महायुती सरकारने विधिमंडळाचे विशेष अधिवेशनात मराठा आरक्षण विधेयक २०२४ सादर करून, एक मताने मंजूर केले, या विधेयकाद्वारे मराठा समाजाला शिक्षण आणि सरकारी नोकरी १०% आरक्षण देण्यात आले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाच्या मूळ प्रश्नावर भर देत अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या तीन नवीन योजना सुरू करून ८०० कोटीपेक्षा अधिक निधी दिला, मराठा समाजातील मुलांना शिक्षणासाठी मदत करताना राज्य सरकारने राजषी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना सुरू केली. मराठा समाजाला आरक्षण देण्याचे काम देवेंद्रजी फडणवीस यांनी केले. यावेळी शरद पवार हे मराठा समाजाचे असतानाही तसेच ती चार वेळा मुख्यमंत्री होते, अनेक वर्ष सत्तेत होते, त्यावेळी त्यांनी मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न गांभीर्याने घेतला नाही, शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी ते आरक्षण घालवण्याचे काम केले.

मराठा समाजाला देवेंद्रजी फडणवीस यांनी टिकणारे आरक्षण दिले, मात्र तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यामुळे ते मिळाले नाही, मराठा आरक्षणाचे मारक केवळ शरद पवार आणि उद्धव ठाकरे आहेत. इतर एकही मुख्यमंत्र्यांना मराठा समाजाला आरक्षण देता आले नाही, ते आरक्षण देवेंद्रजी फडणवीस यांनी दिले आहे ठाकरे सरकारने गंभीर चुका केल्यामुळे आणि सरकारच्या बेफिकिरी मुळे मराठा समाजाने असलेले आरक्षण गमावले, व या सरकारमुळे सर्वोच्च न्यायालयाने सर्वप्रथम मराठा आरक्षणाला स्थगिती दिली, यानंतर ठाकरे सरकारने मराठा समाजाला पुन्हा आरक्षण मिळवून देण्यासाठी कोणतेही गंभीर प्रयत्न केले नाहीत. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजप युती सरकारने २०१८ साठी कायदा करून मराठा समाजाला सरकारी नोकरी व शिक्षणात आरक्षण दिले त्यामुळे मराठा समाजाचे अनेक वर्षाची मागणी पूर्ण झाली. देवेंद्रजी फडणवीस सरकारने वेगवेगळ्या माध्यमातून मराठा समाजातील घटकासाठी काम केले. असे काही लोक म्हणत होते की त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी मराठ्यांना आरक्षण मिळवून दिले होते. मात्र फडणवीस यांची सरकार पायउतार झाल्यानंतर काही लोक मराठ्यांच्या आरक्षणा विरोधात न्यायालयात गेले होते. न्यायालयाने ही आरक्षण रद्द केल्याने या आरक्षणाचा लाभ समाजाला मिळू शकला नव्हता मराठा समाजातील गरजू लोकांना आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे यांनी याचे आंदोलन सुरू केले होते. मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे मात्र ते घटनेत आणि कायद्यात टिकायला हवे माहितीचे सरकार मराठा समाजाच्या आरक्षणासाठी आग्रही आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनीच मराठा समाजाला आरक्षण मिळवून दिले आहे.

आतापर्यंत अनेक मराठा मुख्यमंत्री असताना देखील मराठा आरक्षण देऊ शकली नव्हते. मात्र मुख्यमंत्री देवेंद्रजीत फडणवीस यांनी मराठा समाजाला आरक्षण दिला आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाचे जनक देवेंद्रजी फडणवीस आहेत असे मत भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतन श्री केदार सावंत यांनी व्यक्त केले.

## १२ लाख ७० हजारांचा बनावट मद्यसाठा जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : श्री गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सोलापूर विभागीय राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध दारूबाजांविरोधात मोठी कारवाई केली आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुळेगाव तांडा परिसरात अवैध गोवा बनावटीचे विदेशी मद्यसाठा आणि बनावट देशी-विदेशी दारू निर्मिती केंद्रावर धाड टाकत तब्बल १२ लाख ७० हजार ३२० रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दि. २ सप्टेंबर रोजी राज्य उत्पादन शुल्क विभाग, ब विभाग सोलापूर यांना मिळालेल्या खात्रीलायक माहितीनुसार ही कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान, गोवा राज्य निर्मित विदेशी मद्याच्या ९३६ बाटल्या (७५० मि.ली.), १९२ बाटल्या (१८० मि.ली.), बनावट देशी दारूच्या तब्बल ८,९०० बाटल्या (९० मि.ली.), विविध ब्रँडचे १५०० बनावट लेबल, ९५०० बनावट बुचे, विदेशी मद्याच्या रिकाम्या बाटल्या असा मोठा साठा उघडकीस आला. या कारवाईत संशयित शिशुपाल धनु राठोड फरार असून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अवैध दारू निर्मिती, विक्री आणि वाहतूक थांबवण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने विशेष मोहीम सुरू करण्याचे जाहीर केले आहे. अवैध दारूबाबत माहिती असल्यास नागरिकांनी टोल फ्री १८००२३३९९९९ किंवा व्हॉट्सॲप क्रमांक ८४२२००११३३ वर कळवावी, माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाईल, असे अधीक्षक भाग्यश्री पं. जाधव यांनी सांगितले.

## नैताळे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी मोतीराम भवर बिनविरोध




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी :-नैताळे/रामपुर ग्रुप ग्रामपंचायतीच्या सर्व सदस्य मंडळाची अत्यंत महत्वाची बैठक आज ११ वाजता ग्राम पंचायत कार्यालयात बोलविण्यात आली होती सरपंच निशा पाठक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकित उपसरंचपदी मोतीराम वामन भवर यांची बिनविरोध निवड करण्यात आली सदर निवडीची घोषना होताच सर्व समर्थकाकडून मोठ्या प्रमानावर फटाक्याची आतिबाजी करण्यात आली.

नैताळे/रामपुर ग्रुप ग्राम पंचायतीच्या उपसरपंच सोनाली घायाळ यांनी अंतर्गत ठरलेल्या रोटेशन पध्दतीनुसार आपल्या उपसरपंच पदाचा राजीनामा दिला होता तो मंजुर झाल्याने नविन उपसरपंच पदाच्या निवडीसाठी आज ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच निशा पाठक यांच्या अध्यक्षतेखाली प्रक्रिया राबविण्यात आली उपसरपंच या पदासाठी मोतीराम वामन भवर यांनी आपले नामनिर्देशन पत्र दाखल केले होते त्यावर सुचक म्हणून राजेंद्र बोरगुडे तर अनुमोदन गायत्री बोरगुडे यांनी सही केली होती छाननीत सदरचे नामनिर्देशनपत्र योग्य व बरोबर असल्याने ते मंजुर करण्यात आले तसेच विहीत मुदतीत फक्त एकच नामनिर्देशन पत्र दाखल झाल्याने मोतीराम भवर यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषना निवडणूक अधिकारी तथा ग्राविकास अधिकारी उज्वला भोईर यांनी केली या बैठकीस सदस्य रश्मी बोरगुडे, सोनाली घायाळ, गायत्री बोरगुडे, राजेंद्र बोरगुडे, नवनाथ बोरगुडे, राजू पठाण, मनिषा गवारे, मिराबाई गोधडे हे उपस्थित होते.

## विद्यापीठाच्या अधिसभेवर आमदार देवेंद्र कोठे यांची नियुक्ती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अधिसभेवर आमदार देवेंद्र कोठे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष ....यांनी ही नियुक्ती केली. आमदार देवेंद्र कोठे यांच्या नियुक्तीचे पत्र पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात पाठवण्यात आले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम २८ (२) () नुसार ही निवड करण्यात आली आहे. आमदार देवेंद्र कोठे यांच्या सदस्यत्वाचा कालावधी ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत असणार आहे. आमदार देवेंद्र कोठे यांच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अधिसभेवर झालेल्या नियुक्तीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी अभिनंदन केले आहे.



## मा. शैलेंद्र भाऊ चव्हाण यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक विस्तार समिती आंदोलन यशस्वी केल्या बद्दल स्मारक समिती कोर कमिटी चे मा. शैलेंद्र भाऊ चव्हाण यांचे अक्कलकोट तालुका पुणे रहिवासी संघाच्या वतीने अभिनंदन करून सत्कार करण्यात आला यावेळी अक्कलकोट तालुका पुणे रहिवासी संघाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. राहुल रूही लोकशाही मराठी चे पत्रकार चंद्रशेखर भांगे, दशरथ मडीखांबे, ज्येष्ठ नेते रघुनाथ गायकवाड, विश्वनाथ शिंदे, राजीव मुंदेनकेरी, परमेश्वर मुंदेनकेरी, संदीप हिवाळे, जयभीम गायकवाड, अविनाश शिंगे, मयूर सोनकांबळे, अनिल शिंदे, डॉ. सुनील गायकवाड ,सागर सोनकांबळे ,बसवराज अलमेल, रमेश पठार श्रीकांत मडीखांबे, दारूबंदी निरीक्षक विशाल चोपडे, अनिल सोनकांबळे, तसेच रहिवासी संघातील अनेक सदस्य उपस्थित होते.

## उपसरपंच राम बिराजदार यांचा वृक्ष लागवड करुन वाढदिवस साजरा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : तांबरवाडी राजेवाडी गावचे विकासाभिमुख असलेले उगवत युवा नेतृत्व उपसरपंच राम दिपक बिराजदार व ड सोमनाथ भालचंद्र बोडके यांच्या वाढदिवसानिमीत्त पर्यावरण पुरक १०१ नारळ वृक्ष झाडे लागवड करत पर्यावरण पुरक उपक्रम राबउन ग्रिन वाढदिवस साजरा करण्यात आला यावेळी गावातील मुख्य रस्त्याच्या कडेला नारळ वृक्ष लागवड करण्यात आली यावेळी औसा तालुक्याचे लोकप्रिय आमदार अभिमन्यू पवार साहेब यांचे पिताश्री ह भ प दत्ताज्य गुरुजी पवार यांच्या व किल्लारी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक डॉ शहाने यांच्या प्रमुख उपस्थीतीत नारळ वृक्ष लागवड करण्यात आली.

यावेळी सरपंच राधाकृष्ण जाधव, सुग्रीव लोंढे, जिवनराव पाटील, दिपकराव बिराजदार, बाळासाहेब पाटील, संजय लोंढे, सचिन अनसरवाडे, बजरंग बाजुळगे, रोहिदास जगताप ,समाधान बिराजदार, शुभम माडजे ,प्रमोद माडजे,नामानंद उजळंबे,आमोल पाटील ,निशांत पाटील ,शैलेश बाजुळगे ,माउली बिराजदार ,शाम बिराजदार ,संतोष बिराजदार दयानंद आनसरवाडे बाळासाहेब पाटील, विकास बिराजदार, मोहनराव पाटील बजरंग बाजुळगे, सुनील पाटील.चेअरमन माधव बिराजदार, विक्रम बिराजदार, विठ्ठल बाजुळगे, सोमनाथ उजळंबे, मनामानंद उजळंबे, मुकेश सुरवसे, बापुराव सुरवसे, ग्रामसेवक शरद बिराजदार, मनोज उजळंबे, सोमनाथ बाजुळगे .अमर जगताप, हरि बिराजदार, प्रशांत बिराजदार, हनमंत बाजुळगे, बब्रुवान आनसरवाडे, संजय बिराजदार, संदिप बाजुळगे, विशाल बाजुळगे, अभिजीत टाके सह तांबरवाडी राजेवाडी गावातील व परीसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**गणेशोत्सव व्याख्यानमाला - पुष्प - ७**

# १४० करोड भारतीयांच्या जिद्दीमुळे ऑपरेशन सिंदुर यशस्वी : प्रदिप बापट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : सारेजग शांत होते तेव्हा आपले इस्त्रो चे शास्तज्ञ टायगर कामगिरी करत होते . भारत आत्मनिर्भर झाला आहे.

१४० करोड भारतीयांच्या जिद्दी मुळे ऑफरेशन सिंदुर यशस्वी झाले . याचे श्रेय भारतीय इस्त्रोच्या संरक्षण सिद्धतेमुळे शक्य झाले .भारताने आपल्या बोर्डर मध्ये राहून पाकच्या १०० किमी आत हल्ला केला . आपली क्षेपणास्त्रे शत्रु च्या क्षेपणास्त्रा च्या अधिक वेगाने लक्ष गाठले . आहे भारताच्या संरक्षण सिद्धतेमुळे आत्मनिर्भरतेमुळ आणण आज सुरक्षित आहोत पिढयानपिढया आपण सुरक्षित राहू . देशासाठी आपण काय करू शकतो याबद्दल प्रत्येकाने विचार केला पाहिजे जवाना चे शास्त्रज्ञ यांनां प्रोत्साहान दिले पाहिजे त्याचे कौतुक केले पाहिजे असे प्रतिपादन सेवानिवृत पीव्ही एस एम व्ही एस प्रदिप बापट यांनी केले.



**पाकिस्तानने ऑफरेशन सिंदुर ला प्रतिकार करताना एक हजार हल्ले केले एकही हल्ला भारताने यशस्वी होऊ दिला पाकचे फक्त ड्रोन मध्ये १०० कोटी चे नुकसान झाले आहे . मेडइन चायना चे अनेक ड्रोन फुसके निघाले चायना चलेगा या नही चलेगा गॅरेटी नाही पाकने ऑफरेशन सिंदुर ला प्रतिकार करताना एक हजार अटॅक हल्ले केले ते हल्ले यशस्वी होण्या पुर्वीच भारताने लक्ष गाठण्या पुर्वीच भारताने विफल केले पाक च्या सैन्याला एक ही लक्ष गाठता आले नाही . शत्रुचा हल्ला हवेत च लक्ष गाठण्या पुर्वीच विफल केला ही आपली संरक्षण सिद्धता आहे हा आत्मनिर्भर भारत बद्दल सांगताना संरक्षण सिद्धतेचे अनेक बारकावे पुवीचा भारत आत्ताचा भारत फरक सांगितला. भारत माता की जय.. वंदे मातरम् असे घोषणा देत व्याखानमालेचे समारोप करण्यात आले.**

विवेकानंद प्रतिष्ठान अध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली गणेशोत्सवा निमित्य आयोजित व्याख्यानमालेत ७ वे पुष्प गुंफताना ' ऑपरेशन सिंदुर । पराक्रम अभूतपूर्व !! या विषयावर सेवानिवृत पीव्ही एस एम व्हीएस एम प्रदिप पद्माकर बापट सेवानिवृत्त विंग कमांडर अविनाश मुगळ यांनी भारतीय संरक्षण सिद्धते बद्दल इस्त्रोच्या अभुतपुर्व तंत्रज्ञाना बद्दल भारतीय जवानांच्या . प्रशिक्षण बद्दल अभुतपुर्व कामगिरी बद्दल गौरवपूर्ण प्रेरणादायी जाज्वल देशभक्तीचा अंगार कथन केला. याप्रसंगी बापट बोलत होते.

प्रारंभी दिप प्रज्वलन व प्रतिमा पुजन सेवानिवृत पीव्ही एस एम व्ही एस प्रदिप बापट सेवानिवृत विंग कंमाडर अविनाश मुगळ सौ.वसुंधरा मुगळ' प्रविण शहा शिवशंकर वाले,पत्रकार अरविंद पाटील बाबासाहेब निंबाळकर मारुती बावडे राजेश जगताप हस्ते करण्यात आले सेवानिवृत पीव्ही एस एम व्हीएस एम प्रदिप पद्माकर बापट सेवानिवृत्त विंग कमांडर अविनाश मुगळ यांचा विवेकानंद प्रतिष्ठानच्या वतीने समर्थांची प्रतिमा रोपटे देऊन यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे संचालक मल्लीनाथ कल्याणशेट्टी, प्रा भिमराव साठे, मुकुंद पतकी, अशोक येणगुरे विलास कोरे महेश वागदरे, विक्रम शिंदे मलकप्पा भरमशेट्टी सुरेश आवटे चंद्रकांत दसले, महेश कापसे, तळवार सर, गुरुपादप्पा आळगी,खंडेराव घाटगे लाडप्पा भंडारे वर्षा तडकलकर सोनल जाजू विद्याश्री निलंगे रेखा कालीबते आदि बहुसंख्य रसिक श्रोते महिला वर्ग उपस्थित होते.

सूत्रसंचालन बापूजी निंबाळकर व परिचय कल्पना स्वामी व आभार निशिगंधा सोमेश्वर यांनी मानले.

## सोलापूर पोलिसांची ४८ जणांना शहराबाहेर हद्दपारीची कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर शहरात सार्वजनिक गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद २०२५ मोठ्या प्रमाणावर साजरी होत आहे. मात्र या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेला धक्का लागू नये यासाठी पोलिसांनी कडक पावले उचलली आहेत. शहरातील विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन किंवा त्यापेक्षा जास्त गुन्हे दाखल असलेल्या तब्बल ४८ गुन्हेगारांना भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १६३ (२) अंतर्गत नोटीस देत मिरवणूक क्षेत्राबाहेर हद्दपारीचे आदेश जारी करण्यात आले आहेत.

हे आदेश दि. ५ ते ७ सप्टेंबर या कालावधीत लागू राहणार असून, आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याबाबत पोलीस आयुक्तालयाने इशारा दिला आहे. हे आदेश पोलीस उपायुक्त (परिमंडळ) विजय कबाडे यांनी पारित केले असून, संबंधित इसमांना तसेच पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांना याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्याचे काढण्यात आलेल्या आदेशात म्हंटले आहे.

## मंडप बदलण्यावरून हाणामारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : विजापूर नाका झोपडपट्टी क्रमांक ०२, गौड गल्ली, एकता मित्र मंडळ येथे मंडपाच्या कापड बदलण्याच्या वादातून हाणामारीचा प्रकार घडला.फिर्यादी मोतीलाल श्रीपती ढोकरे (वय ६६) मंडपाचे काम करताना आरोपी अजित तारासिंग साळुंखे (रा. दोन नंबर झोपडपट्टी, गौड गल्ली) याने कापड बदलण्याची मागणी केली. मंडळ पदाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसारच कापड बसवले जात असल्याचे सांगितल्यावर संशयित आरोपी संतापला. त्याने शिवीगाळ करून लाकडी बांबूने मारहाण करत ढोकरे यांच्या डाव्या कानाला दुखापत केली. याप्रकरणी विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.